॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २१ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३६३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻

कल्पना आपल्या स्वप्नांवर राज्य करतात.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### मेलोडी

जगण्याला इथे
रोजच बसते खीळ
अन परदेशात जाऊन
ते घालताय शीळ
विश्वगुरूला करावे आता
कोणत्या हाताने वंदन
देश लोटला खाईत
पण इथे मिळेना इंधन

# औषध विक्रेत्यांचा कडकडीत बंद

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मेडिकल चालकांचा मोर्चा । ऑनलाइन औषध विक्री बंदची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
ऑनलाइन औषध विक्रीवर बंदी आणावी या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बुधवारी पुकारलेल्या देशव्यापी संपाला अहिल्यानगर शहरातही औषध विक्रेत्यांनी १०० टक्के प्रतिसाद देत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.



जिल्हा केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. ऑनलाइन औषध विक्रीमुळे नियमबाह्य औषध पुरवठा आणि गैरप्रकार वाढत आहेत. तसेच कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी डिस्काउंटमुळे लहान आणि पारंपरिक मेडिकल दुकानदारांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

विनाप्रिस्क्रिप्शन (डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय) होणाऱ्या औषध विक्रीमुळे तरुण पिढीच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने औषधांची ऑनलाइन विक्री तत्काळ बंद करावी तसेच शासनाने कोरोना काळातील औषध विक्रीसंदर्भातील अध्यादेश तत्काळ रद्द करावेत, अशी मागणी यावेळी गाडळकर यांच्यासह औषध विक्रेत्यांनी केली.

शासनाने मागण्या मान्य केल्या नाही तर यापेक्षाही मोठे आंदोलन उभारले जाणार असल्याचा इशारा यावेळी गाडळकर यांनी दिला. या आंदोलनात गाडळकर यांच्यासह संघटनेचे सचिव मनीष सोमाणी, भरत सुपेकर, महेश आठरे, अमित धाडगे, कमलेश गुंदेचा, संजय गुगळे, संदीप कोकाटे, मिलिंद क्षीरसागर, महेश अनमल यांच्यासह औषध विक्रेते सहभागी झाले होते.

केमिस्ट असोसिएशनने संप पुकारल्यानंतर बुधवारी दिवसभर शहरातील १२०० मेडिकल व सर्व औषध एजन्सी बंद ठेवण्यात आल्या होत्या. हॉस्पिटलमधील मेडिकल चालकही या संपात सहभागी झाले होते. मात्र, हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेल्या

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने पुकारलेल्या देशव्यापी संपाला अहिल्यानगर शहरातही औषध विक्रेत्यांनी १०० टक्के प्रतिसाद देत मेडिकल बंद ठेवले होते. रुग्णांना गरजेच्या असलेल्या औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी संघटनेच्या वतीने काळजी घेण्यात आली होती. यासाठी शहरातील काही हॉस्पिटलमध्ये औषध विक्री सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे तत्काळ औषधाची गरज असलेल्या कोणत्याही रुग्णाची अडचण झाली नाही, असे संघटनेचे अध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी सांगितले.

# शेवगाव पोलिसांचा जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ९ जण ताब्यात

## दुचाकी, मोबाईलसह ३.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**● शेवगाव । वीरभूमी–**
शेवगाव पोलीस स्टेशन हद्दीतील जुने दहिफळ येथे अवैधरित्या सुरू असलेल्या तिरट जुगार अड्ड्यावर शेवगाव पोलिसांनी छापा टाकला. यावेळी ९ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून मोटारसायकली, मोबाईल आणि रोख रक्कम असे एकूण ३,१५,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, जुने दहिफळ गावातील लोखंडे किराणा दुकानाशेजारी पिवळी ताडपत्री लावून काही व्यक्ती 'तिरट' नावाचा हार-जीताचा जुगार खेळत आहेत. माहिती मिळताच निरीक्षक मुटकुळे यांनी दोन पंचांसह तत्काळ तपास पथक तयार करून घटनास्थळी छापा टाकला. छाप्यामध्ये काही जण गोलाकार बसून पैशांवर तिरट जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी पंचनामा करून शफीक युसूफ शेख, उत्तम दगडू दिवटे, बाबासाहेब पाराजी मगर, रामदास आबासाहेब शिंदे, रामचंद्र मनोहर कुळभाऊ, शेषराव नानासाहेब गायकवाड, युनूस रुस्तुम शेख, बाळू उत्तम परदेशी व सुन्नीभाऊ सुलेमान शेख यांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान जुगाराचे साहित्य, पैशांच्या देवाणघेवाणीसाठी वापरलेले मोबाईल तसेच तीन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. यात बजाज पल्सर, टीव्हीएस स्टार आणि हिरो स्प्लेंडर या मोटारसायकलींसह विविध कंपनीचे सहा मोबाईल व ५,५०० रुपयांची रोख रक्कम सामील होती.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शाम बाबासाहेब गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून शेवगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ४२३/२०२६ नोंदविला गेला आहे. महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे, बाजीराव सानप, नितीन भताने, निलेश म्हस्के, शाम गुंजाळ, भगवान सानप, राहुल आठरे, ईश्वर बेरड, राजु बडे, वसंत वैद्य, एकनाथ बुधवंत, सुरज भावले, संपत खेडकर व प्रशांत आंधळे यांच्या पथकाने केली. पुढील तपास नितीन भताने करीत आहेत.

## SPOT NEWS

### पुण्यात गोळीबाराचा थरार

**● पुणे –** धनकवडी बालाजीनगर परिसरात बुधवारी सकाळी पुन्हा एकदा टोळी संघर्षाचा रक्तरंजित अध्याय समोर आला. वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपीचा भाऊ अक्षय ऊर्फ बाळा म्हस्के (रा. आंबेगाव पठार) याची गोळ्या झाडून आणि त्यानंतर कोयत्याने वार आले आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा खून टोळी युद्धातील 'रिप्लाय अटॅक' असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. माहितीनुसार, सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास अक्षय म्हस्के याच्यावर प्रथम दोन तीन गोळ्या झाडण्यात आल्या. तो जखमी होऊन खाली पडताच हल्लेखोरांनी त्याच्या तोंडावर आणि शरीरावर कोयत्याने सपासप वार केले. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अक्षयचा भाऊ आकाश म्हस्के हा सध्या वनराज आंदेकर खून प्रकरणात तुरुंगात आहे. विशेष म्हणजे, वनराज आंदेकर यांचाही याच पद्धतीने गोळ्या झाडून आणि नंतर कोयत्याने वार करून खून करण्यात आला होता. त्यानंतर आंदेकर टोळीनेही संबंधित आरोपींच्या भावांवर अशाच स्वरूपाचे हल्ले केल्याची चर्चा आहे.

### लिपिक टंकलेखक पदांसाठीची टंकलेखन चाचणी रद्द

**● मुंबई –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या राज्यातील लाखो उमेदवारांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र गट-क सेवा अंतर्गत येणाऱ्या लिपिक टंकलेखक आणि कर सहाय्यक या संवर्गासाठी आयोगातर्फे घेतली जाणारी टंकलेखन कौशल्य चाचणी पूर्णपणे रद्द करण्यात आली. आयोगाने यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक बुधवारी (२० मे २०२६) प्रसिद्ध केले. या निर्णयामुळे परीक्षा प्रक्रिया अधिक सुटसुटीत होणार असून अंतिम निकालही कमी वेळेत जाहीर होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २४ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता. हा नवा बदल बैठकीच्या दिनांकापासून म्हणजेच २४ एप्रिल २०२६ पासूनच तात्काळ अंमलात येईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी उमेदवारांकडे शासनमान्य टंकलेखन प्रमाणपत्र असूनही आयोगाकडून पुन्हा स्वतंत्रपणे टंकलेखन चाचणी घेतली जात होती. या दुहेरी प्रक्रियेमुळे अंतिम निकाल लागण्यास मोठा विलंब होत होता. हीच बाब लक्षात घेऊन आयोगाने कौशल्य चाचणी रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

# एमआयडीसीतील कंपनीला आग

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
नागापूर एमआयडीसीतील निंबळक रस्त्यावर असलेल्या 'ग्लोबल ट्रेडिंग' कंपनीला बुधवारी दुपारच्या सुमारास आग लागली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने परिसरात धुराचे साम्राज्य पसरले होते.

या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशामक दलाच्या २ गाड्या आणि महापालिका अग्निशामक दलाची एक गाडी अशा ३ अग्निशमन बंबाच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.

एमआयडीसी मध्ये निंबळक शिवारात रेल्वेमार्गाजवळ स्क्रॅप मटेरियलची ग्लोबल ट्रेडिंग कंपनी आहे. दुपारी दोनच्या दरम्यान कंपनीला आग लागली. अवघ्या काही वेळातच आगीने संपूर्ण कंपनी व्यापून टाकली. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन दलासही पाचारण करण्यात आले. तीन गाड्यांच्या माध्यमातून पाण्याचा मारा केल्यानंतर ही आग आटोक्यात आली. ही आग नेमकी कशामुळे लागली हे समजू शकले नाही. यावेळी परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

महापालिकेच्या अग्निशमन दलातील सुरेश पोकळे, ज्ञानेश्वर चाकणे, सिकंदर वाखरे, भरत पडगे, आतिश भापकर, अमोल डमाळे, सागर भिंगारदिवे, सोमनाथ गिते, किरण चव्हाण, भारत नेवल, नागनाथ नाईक यांनी ही आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

# बिबट्याच्या हल्ल्यात तीन वर्षीय बालिका गंभीर जखमी

## कुंभेफळच्या शिववाडी परिसरातील घटना

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील कुंभेफळ येथील शिववाडी परिसरात घराबाहेर खेळत असलेल्या तीन वर्षीय बालिकेवर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात बालिका गंभीर जखमी झाली असून ग्रामस्थांनी वेळीच धाव घेतल्याने तिचा जीव थोडक्यात बचावला. या घटनेमुळे कुंभेफळसह परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

श्रीशा वैभव शिंदे (वय ३) असे जखमी बालिकेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ती घराजवळ खेळत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने तिच्यावर झडप घातली.

बालिकेच्या आरडाओरडाचा आवाज ऐकून शेजारील नागरिक तातडीने मदतीसाठी धावले. ग्रामस्थांनी मोठा गोंधळ घालत आरडाओरडा केल्याने बिबट्याने बालिकेला सोडून पळ काढला. मात्र, या हल्ल्यात बिबट्याचे दात लागल्याने बालिकेच्या डाव्या हाताला, पाठीला व मानेवर गंभीर दुखापत झाली आहे.

अकोले ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे काम सुरू असल्याने जखमी बालिकेला तत्काळ सुगाव खुर्द येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. शंतनू राहणे यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी तिला अकोले येथील डॉ. बंगाळ हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले असून सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी आनंदा पाटील, वनपाल जाधव, करवर आणि बबन झोळेकर यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला तसेच रुग्णालयात जाऊन बालिकेची विचारपूस केली.

दरम्यान, परिसरात बिबट्याची वाढती दहशत लक्षात घेता तातडीने पिंजरा लावून वन विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सुनील कोटकर, दिलीप कोटकर, दत्ता कोटकर, मोहन पांडे, अशोक पांडे, गणेश कोटकर, विकास पांडे, दत्ता पांडे, प्रशांत कोटकर, पोपट कोटकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# मोटेगावकरच्या पत्नीला देखील 'सीबीआय'ची नोटीस

**● लातूर । वीरभूमी–**
शहरातील आरसीसी क्लासेस संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याच्या अटकेनंतर मोटेगावकरच्या १२ वीत असलेल्या व नुकतीच नीट परीक्षा दिलेल्या अल्पवयीन मुलाची सीबीआयने लातूर आणि पुण्यात कसून चौकशी केल्यानंतर सीबीआयने आता शिवराज मोटेगावकर याच्या पत्नीलादेखील नोटीस बजावत पुण्यातील सीबीआय कार्यालयात हजर होण्यास सांगितले आहे. सीबीआयने प्रा. शिवराज मोटेगावकर याची लातूरात त्याच्या घरी तब्बल ८ तास कसून चौकशी केल्यानंतर त्याला सीबीआयच्या पुणे कार्यालयात हजर होण्याचा आदेश दिला होतो.






# जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी सरस्वती घुले; व्हा. चेअरमनपदी शिवाजी कराड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेत खंदेपालट करण्यात आली आहे. बुधवारी २० मे रोजी बँकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यात चेअरमनपदी संगमनेरच्या संचालिका सरस्वती घुले-सहाणे यांची तर व्हाईस चेअरमन पदी शिवाजी कराड यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या उपस्थिती या निवडी करण्यात आल्या.





दरम्यान, मावळते चेअरमन गोरक्षनाथ विटनोर व व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी राजीनामा दिल्याने सदर निवडी करण्यात आल्या. चेअरमन पदाची सूचना संदीप मोटे यांनी मांडली. अनुमोदन निर्गुणा बांगर-कापसे यांनी दिले. तर व्हाईस चेअरमन पदाची सूचना ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी मांडली तर अनुमोदन आण्णासाहेब आभाळे यांनी दिले. चेअरमन पदासाठी झालेल्या निवडणुकीत १७ विरूध्द ४ मतांनी घुले यांनी बाजी मारली. कराड यांची व्हॉईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली. विद्युलता आढाव यांच्यासह गोकुळ कळमकर, शरद सुद्रिक, राजेंद्र ठोकळ, संदीप मोटे पाटील, संचालक कल्याण लवांडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी दत्ता पाटील कुलट, राजेंद्र सदगीर, अर्जुन शिरसाठ, बाबासाहेब खरात, रविकिरण साळवे, बबन गाडेकर, संतोष दुसुंगे, संतोष भोपे, रमेश दरेकर, विजय ठाणगे, पी. डी. सोनवणे, नारायण पिसे, आबासाहेब दळवी, राजेंद्र ठोकळ, प्रवीण झावरे, राजेंद्र निमसे, साहेबराव अनाप, बाळासाहेब कापसे, भास्करराव कराळे, प्रल्हाद भालेकर, सुयोग पवार, संतोष मगर, संभाजी आढाव, बाळासाहेब चाबूकस्वार, बाबाजी डुकरे पाटील, कैलास सहाणे, सुनील ढेरंगे, विठ्ठलराव काकडे, विठ्ठलराव काळे, सचिन नाबगे, सरसराम तांबे, चंद्रकांत नरसाळे आदींसह संघ व मंडळाचे तालुकाध्यक्षांसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

मावळते चेअरमन विटनोर यांनी सर्वांचे आभार मानले. संचालक रामेश्वर चोपडे, बाळासाहेब तापकीर, योगेश वाघमारे, कारभारी बाबर, कैलास सारोक्ते, शशिकांत जेजुरकर, माणिक कदम, महेश भनभणे आदींसह मुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत जगताप उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा संघाचे सरचिटणीस प्रकाश नांगरे यांनी केले.

# SPOT NEWS



## १ जानेवारी पासूनची आयडीए वाढ लागू करा; बीएसएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

१ जानेवारी २०२६ पासून देय असलेल्या आयडीए वाढीची तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी तत्काळ अदा करावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर येथील बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनधारकांनी बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. रणरणत्या उन्हात सुमारे २५० पेन्शनधारकांनी मानवी साखळी तयार करून केंद्र शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. कमिटी ऑफ बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशन्स अहिल्यानगर शाखेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात बीएसएनएलचे विद्यमान कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे बीएसएनएल कार्यालय परिसरात काही काळ घोषणाबाजी आणि निदर्शनाने दणाणला. जिल्हा सचिव आप्पासाहेब गागरे, दत्तात्रय भोर, शंकर घुगे, रवींद्र शिंदे आणि सुधाकर पवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत पेन्शनधारकांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी पेन्शनधारकांना न्याय द्या, आयडीए वाढ लागू करा, थकबाकी त्वरित अदा करा अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पेन्शनधारकांनी त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून, भारत सरकार आणि दूरसंचार विभागाने याप्रकरणी आणखी विलंब न करता तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## नगरात रंगणार मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार दि. २७ मे ते रविवार दि. ३१ मे २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली. या स्पर्धेत देशभरातील नामांकित बुद्धिबळपटू सहभागी होणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला सहभाग निश्चित केला आहे. तसेच अनेक दिग्गज बुद्धिबळपटूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. विशेष म्हणजे अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ७५ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले. या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला असून बुद्धिबळप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव हे बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ९-३० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना सुद्धा खेळणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता होणार असून त्यानंतर स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या खेळविण्यात येणार आहेत. अंतिम बक्षीस वितरण समारंभ रविवार दि. ३१ मे रोजी दुपारी ३ वाजता अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक ८५ करंडके तसेच सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे (जळगाव) कार्यभार सांभाळणार असून त्यांना पवन राठी (पुणे) सहाय्यक पंच म्हणून सहकार्य करणार आहेत. त्यांच्यासोबत ६ सहाय्यक पंचांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्पर्धा जागतिक बुद्धिबळ महासंघाच्या नियमावलीनुसार पार पडणार आहे. विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येणार आहे.

# ‘अ, ब, क, ड’ आरक्षण उपवर्गीकरणासाठी मातंग समाज आक्रमक

## पाथर्डी तहसील कार्यालयावर न्यायगर्जना मोर्चा । अन्याय-अत्याचार थांबविण्याची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

मातंग समाजातील कार्यकर्ते सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी येथे ‘अ, ब, क, ड’ आरक्षण उपवर्गीकरण तातडीने लागू करावे तसेच दलित व आदिवासी समाजावर होणारे अन्याय आणि अत्याचार त्वरित थांबवावेत, या प्रमुख मागण्यांसाठी न्यायगर्जना मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मोर्चेकऱ्यांनी तहसील कार्यालयावर धडक देत जोरदार घोषणाबाजी केली. आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे अशा घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला.

यावेळी सतीश शिंदे यांनी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा दिला.

मोर्चादरम्यान तहसील प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या तीस वर्षांपासून अनुसूचित जातीतील उपेक्षित घटकांना



न्याय मिळावा म्हणून ‘अ, ब, क, ड’ आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. मात्र शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

तसेच अनुसूचित जातीतील नागरिकांवर स्थानिक व राजकीय स्तरावर अन्याय होत असून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. अनेक प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासन आरोपींना सहाय्य करत असल्याचाही गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला.

मातंग समाजातील महापुरुष व नेत्यांवर सोशल मीडियासह विविध माध्यमांतून अश्लील भाषेत टीका केली जात असल्याचा निषेध व्यक्त करत संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करण्याची मागणीही आंदोलकांनी केली.

या आंदोलनात कैलास खंदारे, वसंतराव सकट, सुनिल शिंदे, सिताराम शिश्या, माऊली जगधने, किरण कणगरे, प्रविण वैरागर, लक्ष्मण निक्षे, सचिन गायकवाड, हिरामणजी गायकवाड, मैनाबाई बर्डे, भिमाबाई हिवाळे, पूजा शिंदे, दिपाली शिंदे, कमन पवार, राजू शिरसाठ, सोमनाथ माळी, अरुण बरडे, गणेश माळी, अदिप शांगुडे, सागर शिंदे, नहु चण्हाते यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

# चापडगाव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

## इयत्ता पाचवीचे ८ व आठवीचा १ विद्यार्थी पात्र

**● शेवगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील चापडगाव येथील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

यावर्षी शाळेतील इयत्ता पाचवीतील ८ विद्यार्थी तर इयत्ता आठवीतील १ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना शाळा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

शाळेत शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, नियमित सराव परीक्षा तसेच विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि यश संपादन करणे शक्य झाले.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत ऋतुजा तेलोरे (१६४), मानसी गोरे (१४८), सई आंधळे (१४२), रुद्र शहाणे (१४२), चैतन्य वाल्हेकर (१३८), यश तेलोरे (१३२), स्वामिनी जाधव (१२६) आणि आदिती पोपळे (१२६) हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत चैताली घोडके (१४२) हिने यश संपादन केले आहे.


या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, माजी जि.प. सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंहभैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, प्राचार्य अरुण वावरे, प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या विद्यार्थ्यांना शितल दहिवाळकर, संपदा गायके, अनघा बोडखे, अक्षय पुरनाळे, आत्माराम झरेकर, धनश्री धट, सुभाष बर्डे, ज्ञानेश्वर तहकीक, नाफिया शेख, विद्यावर्धिनी मुळे, गजानन दरंदले, सुरेश भापकर, संजय मरकड व प्रभाकर मराठे यांचे मार्गदर्शन लाभले.

# बोरसेवाडी फाट्याजवळ भरधाव कारचा भीषण अपघात; दोघांचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील माणिकदौंडी ते कडा रस्त्यावर बोरसेवाडी फाट्यादरम्यान हॉटेल शुभमजवळ राज्य मार्गावर भरधाव कारचा भीषण अपघात होऊन दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. मंगळवारी (दि. १९) सायंकाळच्या सुमारास ही दुर्घटना घडली.



कालिदास शहादेव वनकर (वय अंदाजे ३०) व बबन किसन खेतमाळीस (वय अंदाजे ६०, दोघेही रा. मिरजगाव, ता. कर्जत) अशी मृतांची नावे आहेत. तर अक्षय नीलेश क्षीरसागर (वय अंदाजे २८) व उमेश मिटकरी (वय अंदाजे ३८, दोघेही रा. मिरजगाव, ता. कर्जत) हे गंभीर जखमी झाले आहेत. आणखी एकजण किरकोळ जखमी झाला असून सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाथर्डीहून मिरजगावच्या दिशेने कार (एमएच १४ एलजी ८४१६) जात होती. माणिकदौंडीच्या पुढे बोरसेवाडी फाट्यादरम्यान हॉटेल शुभमजवळील धोकादायक वळणावर चालकाचा अंदाज चुकल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली.

अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की कारमधील कालिदास वनकर व बबन खेतमाळीस यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत पाथर्डी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर जखमींसह सर्वांना पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमी असलेल्या अक्षय क्षीरसागर व उमेश मिटकरी यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक विलास पुजारी, पोलिस हेडकॉन्स्टेबल सुहास गायकवाड व पोलिस कॉन्स्टेबल धनराज चाळक यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# पारनेर-लोणी रस्त्यावर ब्रँडेड दारूच्या बाटल्यांचा खच

## उच्चभ्रू वस्तीत अस्वच्छतेचा प्रकार । नागरिकांमधून संताप व्यक्त

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर ते लोणी रस्त्यालगतच्या आनंदनगर परिसरात रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात महागड्या व ब्रँडेड दारूच्या रिकाम्या बाटल्या टाकण्यात आल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सुशिक्षित आणि उच्चभ्रू वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिसरात घडलेल्या प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, हा विषय सध्या पारनेर शहरात चर्चेचा ठरला आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी काही मद्यपींकडून घरातील दारूच्या रिकाम्या बाटल्या रस्त्यालगत फेकून दिल्या जात आहेत. त्यामुळे सकाळी फिरण्यासाठी जाणारे नागरिक, महिला व ज्येष्ठ नागरिकांना या अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यावर पडलेल्या काचेच्या बाटल्यांमुळे पादचारी, लहान मुले तसेच जनावरांना दुखापत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या काही नागरिकांकडून सार्वजनिक स्वच्छतेबाबत होत असलेली ही निष्काळजी वर्तणूक चिंतेची बाब असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

घराची स्वच्छता राखताना सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणेही प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. केवळ प्रशासनाने कचरा उचलावा या अपेक्षेने प्रश्न सुटणार नाही. नागरिकांनीही सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.

या प्रकारामुळे सार्वजनिक नैतिकता व सामाजिक जबाबदारीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत



आहे. स्थानिक प्रशासनाने या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणारे व कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# आजचा तरुण : उद्याचा भावी नागरिक

**आजचा तरुण उद्याचा भावी नागरिक आहे. तरुण वर्गाने अगोदर आपल्या स्वतःमध्ये चांगले विचार अंगीकारायला हवेत. चांगले वागणे आचरणात आणायला हवे. थोरामोठ्यांचा आदर करायला हवा. तुम्ही कितीही उच्चपदावर असाल तरी समोरच्या मोठ्या व्यक्तीकडे डिग्री नसेल, तरी त्यांच्या वयाचा विचार करून त्यांच्या डिग्रीशी तुलना न करता, आपल्यापेक्षा ती व्यक्ती वयाने मोठी आहे म्हणून त्यांचा आदर करा. माणूस म्हणून त्यांचा आदर करा. आपल्या स्वतःमध्ये अनेक चांगले बदल आपण स्वतः चांगल्या विचारांनी घडवू शकतो. आपण चांगल्या विचारांनी विकसित झालो, की गावाचादेखील आपण चांगला विकास करू शकतो. गाव सुधारला, की तालुका पातळीवर आपण चांगले काम करू शकतो. नंतर जिल्हा पातळी, मग राज्य पातळी आणि नंतर देश पातळीवर हा तरुणवर्ग खूप चांगल्या पद्धतीने काम करू शकतो.**

हे सगळे जरी खरे असले तरी आजचा तरुणवर्ग हा स्वतःलाच विसरत चालला आहे आणि नको त्या गोष्टींमध्ये स्वतःचा अमूल्य वेळ खर्च करत आहे. अनेक तरुण मुले स्वतःच्या घरच्या परिस्थितीकडे लक्ष न देता फक्त स्वतःपुरते टकाटक राहून जगताना दिसून येत आहेत. वय वाढत चालले तरी काहींना नोकरी नाही. नोकरी नसल्यामुळे लग्नासाठी कुणी मुलगी देत नाही, त्यामुळे असा तरुणवर्ग सध्या ताणतणावात जगताना दिसून येत आहे. तर काही तरुणवर्ग या गोष्टींमुळे व्यसनाच्या आहारी गेलेला दिसून येत आहे. राजकीय लोकांच्या मागे काहीजण धावताना दिसत आहेत. पण जे ध्येयवेडे तरुण आहेत ते मात्र आपल्या करिअरसाठी अभ्यासाचे कष्ट रात्रंदिवस घेऊन देशाचे उज्ज्वल भविष्य बनून शासकीय अधिकारी बनून सक्षम देश बनवण्यासाठी मेहनत घेत आहेत.

ज्या घरातून बालसंस्काराचे धडे या मुलांना शिकवले जातात, चांगल्या-वाईटाची शिकवण या चिमुकल्या मुलांना दिली जाते, लहानपणापासून चुकीच्या गोष्टींपासून दूर ठेवले जाते, अशी मुले करिअर सोडून दुसरीकडे कधीच भरकटत नाहीत. परंतु अनेक तरुण मुलांनी स्वतःचे भविष्य अंधारात ठेवून राजकीय लोकांसोबत राहून स्वतःचे करिअर बरबाद केले आहे. ज्या राजकीय लोकांनी जनतेच्या जीवावर निवडून येऊन स्वतःचेच भविष्य उजळवले आहे, अशा लोकांच्या फक्त सोबत राहायला मिळाले तरी आजचा काही तरुणवर्ग खूश आहे. स्वतःची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असते, तरी या मुलांना फक्त आलिशान गाड्यांमधून फिरायला मिळाले, हॉटेलमध्ये चांगले खायला मिळाले तरी ही मुले यातच खूश असतात. खरं म्हणजे या मुलांसाठी हे छोटंसं विश्व म्हणजे बेडकाच्या डबक्यासारखं आहे. मोठं विश्व यांना बघायचंच नाही. तेवढ्याच डबक्यात ही तरुणाई मर्यादित राहत आहे. पण हा तात्पुरता आनंद देणारा झगमगाट कालांतराने दुःख देणारा आहे हे तरुण मुलांनी विसरता कामा नये.

या लोकांनी त्यांच्या अनेक पिढ्या बसून खातील एवढा बँक बॅलन्स करून ठेवलेला आहे. यांचे अनेक वेगवेगळे बिझनेस असतात, शाळा कॉलेज सुरू करून ओळखीने मान्यता आणणे हे यांचे डावे हाताचे खेळ आहे. गडगंज संपत्ती यांनी कमावलेली असते, पण तरुणांनो तुमचं काय? घरातले माणूस साध्या थंडी-तापाने आजारी पडले तर तुमच्याकडे ॲडमिट करायला पैसा नसतो. बरं, दवाखान्यासाठी किंवा इतर कामासाठी जरी तुम्हाला यांनी थोडीशी पैशाची मदत केली, तरी तुम्हाला तो खूप मोठा उपकार वाटतो, म्हणून तिथेच तुम्ही रिकामटेकड्यासारखे चिकटून राहता का? स्वतःचं विश्व कष्ट करून स्वबळावर निर्माण करा, तरच तुम्हाला लग्नासाठी मुलगी मिळेल.



वीरभूमी

**सौ. आशा सुधीर साठे**

सैनिकपत्नी,
अहिल्यानगर
९६०४०५६९२८

अनेक तरुण मुलांचा राजकीय लोक दादागिरी, भाईगिरीसाठी वापर करून घेताना दिसतात. त्यांनी शब्द फेकायचा आणि या मुलांनी तो झेलायचा. कुठे भांडण करायचे असतील, कुठे एखाद्या प्रॉपर्टीवरून, प्लॉटवरून वाद असतील तर ही मुले भांडण करायला पुढे असतात. यातून मोठा गुन्हा घडला, पोलिस केस झाली तर या तरुणाईचे जीवन बरबाद होते. कोर्टकचेरी मागे लागते, तारखेवर तारखा पडतात. कोर्टाचे हेलपाटे, वकिलाची फी देणेसुद्धा शक्य नसते. मग नसता खटाटोप करायचाच नाही. आपण आपला परिवार आणि आपले करिअर यावरच लक्ष केंद्रित करा मुलांनो. नको त्या मृगजळात अडकूच नका.



असं जीवन जगणे हे जीवन नाही. स्वामी विवेकानंदांनी तरुणांसाठी लिहिलेले विचार आत्मसात करा. स्वतःच्या मनगटात ताकद निर्माण करून स्वबळावर स्वतःचे विश्व निर्माण करा. स्वतःचा अमूल्य वेळ अभ्यासासाठी खर्च करा. नक्कीच तुमच्या आयुष्याचे, तुमच्या घरादाराचे सोनं होईल. तात्पुरता झगमगाट, हॉटेलिंग, फुकटच्या चारचाकीत फिरणे सोडून द्या. या गोष्टी क्षणिक आनंद देणाऱ्या आहेत. यांच्यामागे धावण्यापेक्षा डोंगरावर धावा, रस्त्याने धावा, पोलिसमध्ये भरती व्हा, देशरक्षणासाठी मिलिटरीमध्ये भरती व्हा. ते तुमचे जीवन नेहमीच शानमध्ये असेल. भारतमातेचा पुत्र म्हणून तुमच्याकडे कौतुकाने पाहिले जाईल. पाहा पटतंय का मनाला?

### जाता जाता तरुणाईसाठी काही शब्द

*ऊठ तरुणा जागा हो*
*शिल्पकार तूच तुझ्या जीवनाचा....*
*अभ्यासाचे कष्ट घेऊन घडशील तू*
*चांगला नागरिक या देशाचा....*
*राजकारण्यांमागे नको तू*
*रिकामटेकड्यासारखं फिरूसं....*
*स्वतःचं जीवन नको*
*तू विनाकारण बरबाद करूसं....*
*धावायचंच आहे तुला तर*
*धाव तू डोंगरांगावरून....*
*देशरक्षणाची शपथ घे*
*दाखव तू मिलिटरीत भरती होऊन....*
*जीवन असेल इथे शानमध्ये*
*आणि शानमध्ये मरणही असेल....*
*तुझ्यापाठीमागेही तुझे देशासाठी*
*शहीद म्हणून नाव असेल....*

SPOT NEWS

## हरिहरेश्वर मंदिरात रामकथेचा भक्तिमय सोहळा उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

तपोवन, सूर्यनगर येथील हरिहरेश्वर मंदिर येथे ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी) यांच्या मधुर वाणीतून आयोजित श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सात दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून रामभक्तीचा लाभ घेतला. कथे दरम्यान महाराजांनी प्रभू श्रीराम आणि केवट यांच्या भेटीचा प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत उलगडला. गंगेच्या पलीकडे प्रभू श्रीरामांना नावेतून पोहोचविणारा केवट हा भिल्ल समाजातील होता. मात्र प्रभू श्रीरामांनी त्याच्या जाती-पातीचा विचार न करता त्याला प्रेम, सन्मान आणि आपलेपण दिले. यामधून भगवान रामांनी समता, मानवता आणि भक्ती श्रेष्ठ असल्याचा संदेश दिल्याचे महाराजांनी सांगितले. प्रभू श्रीरामांनी मोबदला म्हणून अंगठी देऊ केली असता केवटाने नम्रपणे नकार दिला. प्रभू, माझा आणि तुमचा धंदा एकच आहे. तुम्ही संसाररूपी भवसागरातून लोकांना तारता, तर मी नदीतून लोकांना पार नेतो. मला कोणताही मोबदला नको, फक्त हा हात धरला तो कधी सोडू नका, असे केवटाने भावपूर्ण शब्दांत सांगितल्याचे वर्णन करताच अनेक भाविक भावूक झाले. वनवास संपवून परत येताना मला विसरू नका, माझ्याच नावेतून प्रवास करा, ही केवटाची विनवणी भक्तांच्या मनाला स्पर्शून गेली. यावेळी महाराजांनी राजा दशरथांच्या दुःखद प्रसंगाचेही अत्यंत भावनिक वर्णन केले. प्रभू श्रीरामांना वनवासाला जावे लागल्याची बातमी ऐकताच दशरथ पूर्णपणे खचून गेले. पुत्रवियोगाच्या वेदनेत असताना त्यांना तरुणपणी घडलेली श्रावण बाळाची घटना आठवली. चुकून श्रावण बाळाचा बाण लागून मृत्यू झाल्यानंतर त्याच्या अंध आई-वडिलांनी दिलेला शाप जसा आम्हाला पुत्रवियोग सहन करावा लागत आहे, तसाच मृत्यू तुलाही पुत्रवियोगाने येईल, - त्यांच्या मनात घुमू लागला. राम... राम... अशी आर्त हाक देत, डोळ्यांत अश्रू आणि अंतःकरणात असह्य वेदना घेऊन दशरथांनी अखेरचा श्वास घेतल्याचे वर्णन ऐकून अनेक भाविकांचे डोळे पाणावले. महाराजांनी सांगितले की, समाजात कोणताही मनुष्य मोठा किंवा लहान नसतो. भक्ती, प्रामाणिकपणा आणि मानवतेची भावना हाच खरा धर्म आहे. श्रीरामांनी भिल्ल केवटाला दिलेला सन्मान हा सामाजिक समतेचा आदर्श संदेश असल्याचे त्यांनी नमूद केले. रामनामाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. संयोजक सूर्यनगर परिसरातील सर्व ग्रामस्थांनी भाविकांसाठी पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था तसेच शिस्तबद्ध नियोजन करून उत्तम सेवा दिली. त्यामुळे संपूर्ण सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## सोमवारपासून अहिल्यानगर इस्कॉनतर्फे भागवत कथा महोत्सव

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाच्या (इस्कॉन) अहिल्यानगर शाखेच्या पुढाकाराने अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे आयोजन येथे करण्यात आले आहे. येत्या सोमवारपासून (२५ मे) ते रविवार ३१ मे २०२६ या काळात रोज सायंकाळी साडेपाच ते साडेआठ या वेळेत पुणे इस्कॉनचे मार्गदर्शक रेवतीनंदन दास यांची प्रवचने होणार आहेत. नवीन टिळक रस्त्यावरील माऊली सांस्कृतिक भवनात (नंदनवन लॉन्स शेजारी, अहिल्यानगर) येथे हा कथा महोत्सव होणार आहे. कीर्तन, कथा, आरती व महाप्रसाद उपक्रम यात होणार आहेत. गिरीवरधारी दास, डॉ. सतीश फाटके, वैष्णवतोष्णी दास व अंजली राधादेवी दासी यांच्यासह अन्य सदस्यांच्या पुढाकाराने हा उपक्रम होणार आहे. अधिक माहितीसाठी ९६७३३९३८७२ यावर संपर्क साधावा. या श्रीमद् भागवत कथा महोत्सवात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच श्रीमद् भगवतगीता आणि श्रीमद् भागवतम् यावर आधारित साप्ताहिक सत्संग कार्यक्रम दर बुधवारी संध्याकाळी ७ ते ८.३० या वेळेत डॉ. सतीश फाटके यांच्या निवासस्थानी असलेल्या सत्संग केंद्रात (वृंदावन बंगला, पॅराडाईज हॉटेलसमोर, नवीन टिळक रोड, अहिल्यानगर) होतो. या सत्संगानंतर महाप्रसाद वाटप होते. यातही भाविकांनी सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

# नगरमध्ये घुमला सामुदायिक पसायदान सोहळ्याचा गजर

### पाच हजाराहून अधिक साधक व भाविकांची उपस्थिती । आर्ट ऑफ लिव्हिंगचा उपक्रम

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे प्रमुख श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर येथील बंधन लॉंसवर आयोजित सामुदायिक पसायदान पठण कार्यक्रमात पाच हजाराहून अधिक साधक व भाविकांनी एका सुरात सादर केलेल्या पसायदानाने परिसर दुमदुमून गेला.

नेवासा येथील संत ज्ञानेश्वर संस्थानमधील शंभराहून अधिक वारकरी विद्यार्थी आणि कात्रड येथील कृष्णाई गुरुकुलच्या वारकरी मुलींचा सहभाग लक्षणीय ठरला. सोहळ्याच्या प्रवेशद्वारावर अहिल्यानगर येथील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साधकांनी उपस्थित भक्तांचे तिलक व महिलांना हळदी-कुंकू लावून स्वागत केले.



नेवासा येथील सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक, वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के, महंत आदिनाथ महाराज शास्त्री आणि दिनेश्वर महाराज यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

व्यासपीठावर आंतरराष्ट्रीय भजन गायक विक्रम हाजरा, ज्ञानेश्वर महाराज कराळे, अहिल्यानगरचे उपमहापौर धनंजय जाधव, सोनई येथील पसायदान आनंदवन सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष विनायक दरंदले उपस्थित होते.

सुरुवातीला उद्धव महाराज यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. पुढे म्हस्के महाराज व आदिनाथ महाराज यांनी शुभेच्छापर भाषणे दिली. सर्व उपस्थितांनी श्री श्री रविशंकर यांच्या कार्याचा गौरव केला.

भजन उत्सव कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भजन गायक विक्रम हाजरा, कृष्णाई गुरुकुलच्या तेजस्विनी महाराज नवले, उपमहापौर धनंजय जाधव, सुनिल सदाफळ, विजय वाकळे, गौतम मुनोत, प्रकाश लोंखडे, डॉ. तानवडे आदी उपस्थित होते. शहर व जिल्ह्यातील पाच हजाराहून अधिक साधक व भाविक उपस्थित होते.

मोबाईलच्या लाईटवर करण्यात आलेला दीपोत्सव लक्षवेधी ठरला. श्री श्री रविशंकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वरमयी भजन उत्सव रात्री उशिरापर्यंत संपन्न झाला. कार्यक्रम महाप्रसाद वाटपाने सांगता झाला.

## सावरगाव तळच्या रेश्मा नेहे यांचा विदेशात डंका

### नॉर्वेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींसमोर भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करण्याचा मान

**संगमनेर । वीरभूमी–**

नॉर्वे देशात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भारतीय शास्त्रीय नृत्यकला सादर करण्याचा बहुमान संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील रेश्मा नेहे यांना मिळाला आहे. हा क्षण अत्यंत गौरवास्पद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच देशांच्या परदेश दौऱ्यावर असून त्यामध्ये त्यांनी नॉर्वे देशालाही भेट दिली. राजधानी ओस्लो येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना नॉर्वे चा सर्वोच्च नागरी सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट प्रदान करण्यात आला. यावेळी भारतीय सांस्कृतिक परंपरेनुसार त्यांचे स्वागत करण्यात आले.

या स्वागत समारंभात नॉर्वेमध्ये भारतीय संगीत व शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण देणाऱ्या रेश्मा नेहे आणि त्यांच्या चमूला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी भरतनाट्यम, कुचिपूडी, ओडिसी, कथक आणि मोहिनीअट्टम या भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांचे सादरीकरण केले. भारतीय संस्कृती, परंपरा आणि कलेच्या सादरीकरणामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रभावित झाल्याचे सांगण्यात आले.

रेश्मा नेहे या संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील साहेबराव गेनूभाऊ नेहे पाटील यांच्या पत्नी असून त्यांचे माहेर निमज येथील शांताराम खंडेराव गुंजाळ यांचे आहे. साहेबराव नेहे हे नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे एका बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत.

रेश्मा नेहे यांनी भारतीय शास्त्रीय संगीत व नृत्याचे उच्च शिक्षण घेतले असून त्या सध्या नॉर्वेमध्ये भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य करत आहेत. त्यांनी तेथे कला नृत्य अकॅडमीच्या माध्यमातून भरतनाट्यम, ओडिसी, कथक, कुचिपूडी, मोहिनीअट्टम आदी शास्त्रीय नृत्यप्रकारांचे प्रशिक्षण सुरू केले आहे.

## मुतखेल आश्रम शाळेची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

### दहावीचा १०० टक्के निकाल । स्कॉलरशिप, जेईई व नीट प्रवेश परीक्षेतही घवघवीत यश

**अकोले । वीरभूमी –**

भंडारदरा धरण जलाशय व अतिदुर्गम अभयारण्य परिसरातील नैसर्गिक आणि भौतिक अडचणींना सामोरे जात शिक्षण घेणाऱ्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, रतनवाडी युनिट-मुतखेल येथील विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.







मार्च २०२६ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेत शाळेचा निकाल नेहमीप्रमाणे १०० टक्के लागला आहे. दहावीच्या परीक्षेत ६ विद्यार्थी विशेष श्रेणीत, २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत पास झाले आहेत.

यामध्ये प्रणय अशोक इदे याने प्रथम, साक्षी संपत शिंदे हिने द्वितीय तर प्रणाली राजाराम भांगरे हिने तृतीय क्रमांक मिळविला आहे.

तसेच एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत पाचवीतील २ आणि आठवीतील २५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

आदिवासी विकास विभागामार्फत घेण्यात आलेल्या जेईई व नीट प्रवेश स्पर्धा परीक्षेत शाळेचे प्रणय अशोक इदे आणि परते राधाबाई बहिरू या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. संबंधित विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा खर्च आदिवासी विकास विभागामार्फत मोफत करण्यात येणार आहे.

शाळेच्या या यशाबद्दल गावच्या सरपंच श्रीमती दिपालीताई रोंगटे, उपसरपंच श्री. कैलास इदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. महादु मोहरे, उपाध्यक्ष श्री. विजय इदे तसेच सर्व सदस्य, मुख्याध्यापक श्री. आदिनाथ सुतार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### आ. काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याने पारनेर व नगर तालुक्यातील

# अवकाळीग्रस्त २८ गावांसाठी मदत प्रस्तावास शासनाची मंजुरी

**पारनेर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीत बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळावी यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत प्रभावी प्रयत्न केले. त्यांच्या या धडपडीमुळे मदत प्रस्तावास अखेर मंजुरी मिळाली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० गावांमधील तब्बल २७ हजार ६०२ शेतकरी बाधित झाले असून १४ हजार ३४९.३७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी सुमारे २५ कोटी २० लाख रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यास आता मंजुरी देण्यात आली आहे.



पारनेर व अहिल्यानगर तालुक्यातील एकूण २८ गावांतील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी प्रशासन व शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळावी यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी चर्चा करून प्रस्ताव गतीने पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे नेतृत्व म्हणून आमदार काशिनाथ दाते यांची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाची मदत लवकरात लवकर मिळावी यासाठी त्यांचे प्रयत्न सुरूच असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

पारनेर तालुक्यातील २३ गावांमधील ४ हजार ८६९ शेतकरी बाधित झाले असून ३ हजार ३६९.०७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले होते. त्यासाठी सुमारे ५ कोटी ७८ लाख रुपयांच्या मदतीची मागणी करण्यात आली होती.

तसेच अहिल्यानगर तालुक्यातील ५ गावांमधील ६४३ शेतकऱ्यांचे ४९८.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. त्यासाठी ८५ लाख रुपयांहून अधिक मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दोन्ही प्रस्तावांना शासनाने मंजुरी दिली असून मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांना संबंधित अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

# स्टार हेल्थने महाराष्ट्रातील १५ ठिकाणी घेतलेल्या आरोग्य तपासणी शिबिरांचा ४५०० हून अधिक लोकांना लाभ

### २० वर्षांच्या सेवेत स्टार हेल्थने समुदायांना आरोग्य जागरूकता, प्राथमिक तपासणी आणि विनामूल्य वैद्यकीय सल्ला दिला

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

पुणे, सातारा, संभाजीनगर, जळगाव, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि बीड यांच्यासह महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे ४,५०० हून अधिक व्यक्तींनी आरोग्य तपासणी, वैद्यकीय मार्गदर्शन आणि आरोग्य जागरूकतेचा लाभ घेतला. महाराष्ट्रात, स्टार हेल्थने २००६ मधील स्थापनेपासून आतापर्यंत १३,७८९ कोटी रूपयांहून अधिक किमतीचे २६.४ लाखांपेक्षा जास्त क्लेम्स (दावे) निकाली काढले आहेत. आपल्या आरोग्य सेवा केंद्र या सीएसआर आधारित उपक्रमाद्वारे, कंपनी अपुऱ्या सोयी-सुविधा असलेल्या समुदायांना विनामूल्य डॉक्टरांचा सल्ला, औषधे आणि निदानात्मक चाचण्या देखील प्रदान करते.

आपल्या सेवा क्षेत्रातील २० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (NSE: STAR HEALTH ; BSE : 543412) महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केलीआहेत. याद्वारे स्थानिक समुदायांपर्यंत मुलभूत तपासणी, आरोग्यजागरूकता आणि आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्याची सुविधा पोहोचवण्यातआली. पुणे, सातारा, अहिल्यानगर, बारामती, दौंड, कोल्हापूर, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला, नांदेड, लातूर, धाराशिव, नंदुरबार आणि बीड येथे हा उपक्रम राबवण्यात आला, जेथे वेळेवर निदान आणि सक्रिय आरोग्य सेवेची व्यापक उपलब्धता वाढवण्यावर भर देण्यात आला. या बहु-शहरी संपर्क मोहिमेचा भाग म्हणून, स्टार हेल्थने ४,५०० हून अधिक सहभागींना आरोग्य तपासणी सुविधा पुरवल्या.

यामध्ये रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेची चाचणी, बीएमआय मूल्यमापन, डोळ्यांची तपासणी आणिसामान्य डॉक्टरांच्या सल्ल्याचा समावेश होता. पुढील वैद्यकीय उपचारांची आवश्यकताअसलेल्या व्यक्तींना त्यांच्या रिपोर्टनुसार मार्गदर्शन करण्यात आले आणिआवश्यकतेनुसार अतिरिक्त सल्ल्यासाठी संदर्भित करण्यातआले. या उपक्रमाचा लाभ ग्राहक, सल्लागार, कर्मचारी आणि स्थानिक समुदायातील वंचित घटकांना मिळाला; ज्यामध्ये आजारांना प्रतिबंध करणे, लवकर निदान करणे आणिआरोग्य जागरूकतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. आरोग्य साक्षरता आणि घरगुती आरोग्य सेवेबद्दल जागरूकतावाढवण्यासाठी,स्टार हेल्थने डॉक्टर आणि समुदायांमध्ये ज्ञान-सामायिकीकरणसत्रांचेही आयोजन केले होते. यामुळे सहभागींना लवकर निदान, उपचारांचेमार्ग आणि वेळेवर वैद्यकीय मदतीचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदतझाली. या उपक्रमाला स्थानिक डॉक्टर, डायग्नोस्टिक सेंटर्स आणिपॅनेलवरील आरोग्य सेवा भागीदारांचे सहकार्य लाभले.

या उपक्रमाच्या व्यापक महत्त्वाबाबत मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे पूर्णवेळ संचालक श्री. हिमांशू वालिया म्हणाले, गेल्या २० वर्षांत, स्टार हेल्थने लाखो कुटुंबांना केवळ क्लेमच्या वेळीच नव्हे, तर त्यांच्या आरोग्य आणि वेलनेसच्या संपूर्ण प्रवासात साथ देऊन त्यांचाविश्वास संपादन केला आहे. यासारखे उपक्रम समुदायांप्रती असलेल्या आमच्यावचनबद्धतेची व्याप्ती आणि खोली दर्शवतात; तसेच अधिक जागरूकतानिर्माण करण्यास, लवकर निदान करण्यास प्रोत्साहित करण्यास आणि आरोग्य सेवांचीउपलब्धता सुधारण्यास मदत करतात. महाराष्ट्रात आमच्या प्रबळ उपस्थितीसह, आम्ही आरोग्य विमा आणि व्यापक आरोग्य व वेलनेस प्रयत्नांच्या माध्यमातूनलोकांपर्यंत पोहोचण्यावर आमचे लक्ष केंद्रित ठेवत आहोत.




या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत स्टारहेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री. विजय अरोरा म्हणाले, महाराष्ट्रा सारख्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण राज्यात, हायपरटेंशन (उच्च रक्तदाब), मधुमेह आणि लठ्ठपणा यांसारखे जीवनशैलीशी संबंधित धोके अधिक गंभीर होण्यापूर्वीच ते ओळखण्यात कम्युनिटी आउटरीच महत्त्वाची भूमिका बजावते. या शिबिरांच्या माध्यमातून, आम्हीसंपूर्ण राज्यातील लोकांच्या राहण्याच्या आणि कामाच्या ठिकाणापर्यंत सक्रिय आरोग्यसेवा, मुलभूत तपासणी आणि आरोग्य जागरूकता पोहोचवत आहोत. हा उपक्रम महाराष्ट्रातील विविध समुदायांसाठी आरोग्य सेवा अधिक सुलभ बनवण्याच्या आमच्या निरंतर वचनबद्धतेचे प्रतीक आहे. स्टार हेल्थसाठी महाराष्ट्र ही एक महत्त्वाची बाजारपेठ राहिली आहे. एकट्या याच राज्यात कंपनीने गेल्या २० वर्षांत १३,७८९ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे २६.४ लाखांहून अधिक क्लेम्स (दावे) निकाली काढले आहेत. तसेच, महाराष्ट्रात कंपनीच्या ८७ शाखा, ३,४०० हून अधिक भागीदार रुग्णालयांचे नेटवर्क, १.२३ लाखांपेक्षा जास्त सल्लागारआणि ५८ स्टार ग्रामीण विमा केंद्रे कार्यरत आहेत. क्लेम्स निकाली काढण्या पलीकडे जाऊन, स्टार हेल्थ डिजिटल आणि आरोग्य सेवा उपक्रमांच्या माध्यमातून एक व्यापक आरोग्य भागीदार म्हणून आपली भूमिका पक्की करत आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये, स्टार हेल्थच्या १ दशलक्ष पेक्षा जास्त ग्राहकांनी टेलिमेडिसिन, आरोग्य तपासणी आणि एआय आधारित आरोग्य स्क्रीनिंग साधनांसह कंपनीच्या डिजिटल आरोग्य सेवांचा वापर केला. स्टार हेल्थचा सीएसआर आधारित प्राथमिक आरोग्य सेवा उपक्रम आरोग्य सेवा केंद्राच्या माध्यमातून कंपनी अपुऱ्या सोयी-सुविधा असलेल्या समुदायांपर्यंत विनामूल्य आरोग्य सेवांचा विस्तार करत आहे. ही केंद्रे मोफत डॉक्टरांचा सल्ला, औषधे, निदानात्मक चाचण्या, आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि फॉलो-अप सपोर्ट प्रदान करतात; ज्यामुळे समुदाय स्तरावर प्राथमिक निगामधील त्रुटी दूरकरण्यास मदत होते. महाराष्ट्रात हा उपक्रम ४ एएसके केंद्रे आणि १ एएसके+ केंद्रासह एकूण ५ केंद्रांच्या माध्यमातून नाशिक, सांगली, सातारा, अकोला आणि कोल्हापूर येथे कार्यरत आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# तीन कर्मचाऱ्यांवर चालतो पाथर्डी बाजार समितीचा कारभार

## नोकरभरतीस शासनाची परवानगी नसल्याने उपक्रम विस्तारावर मर्यादा । शेतकरी हिताच्या सुविधांवर परिणाम होण्याची शक्यता

**● पाथर्डी । वीरभूमी –**
कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल, ए प्लस दर्जा, पारदर्शक व शेतकरी हिताचा कारभार यामुळे सतत प्रगतीपथावर असलेल्या पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीचा कारभार सध्या अवघ्या तीन कर्मचाऱ्यांवर सुरू आहे. मागील चार महिन्यांपासून बाजार समितीकडून नोकरभरतीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू असला तरी अद्याप परवानगी मिळालेली नाही. परिणामी, पुरेशा मनुष्यबळाअभावी विविध उपक्रम व सेवांचा विस्तार करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

शासनाच्या धोरणामुळे बाजार समित्या असून अडचण, नसून खोळंबा अशा अवस्थेत आल्याची भावना व्यक्त होत असून, आवश्यक नोकरभरतीस तातडीने परवानगी देण्याची मागणी होत आहे.

याबाबत बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे यांनी सांगितले की, फेब्रुवारी महिन्यातच सहकार विभाग व शासनाकडे नोकरभरतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पणन मंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन बाजार समितीसमोरील प्रशासकीय अडचणी मांडल्या आहेत.

पाथर्डी तालुक्याचा विस्तार मोठा असून तिसगाव, खरवंडी कासार, भालगाव व टाकळीमानूर येथे उपबाजार समित्या कार्यरत आहेत. या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून उपबाजार अधिक सक्षम करण्याचे नियोजन आहे. तोट्यातील कारभार नफ्यात आणत अवघ्या तीन वर्षांत बाजार समितीने 'ए प्लस' ग्रेडसह प्रथम क्रमांकाचा मान मिळवला आहे.

पाथर्डी बाजारात कांदा, तूर, सोयाबीन, कापूस, गहू, ज्वारी, कडधान्ये व तेलबिया यांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होते. तसेच येथील शेळी बाजार हा जिल्ह्यातील सर्वात मोठा बाजार म्हणून ओळखला जातो.

पारदर्शक कारभार, शेतकरी व व्यापाऱ्यांना दिले जाणारे सहकार्य आणि उत्पन्नवाढीसाठी आखलेले नियोजन यामुळे बाजार समितीच्या ठेवींमध्ये वाढ झाली आहे. सध्या समितीकडे सुमारे दोन कोटी रुपयांच्या ठेवी असून वार्षिक उत्पन्न १ कोटी ९१ लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहे. बाजार समितीच्या आवारात सुमारे १०० भाडेकरू आहेत.

मात्र, कुशल कर्मचारी वर्ग नसल्याने अनेक अत्यावश्यक कामे रोजंदारीवरील कामगारांकडून करावी लागत आहेत. त्यामुळे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवाभावी वृत्तीने कामकाज सांभाळावे लागत असल्याचे बर्डे यांनी सांगितले.

खाजगी बाजारपेठेकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून विविध सुविधा पुरवल्या जातात. मात्र त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व मनुष्यबळ वेळेवर उपलब्ध न झाल्यास अडथळे वाढण्याची शक्यता आहे.

तिसगाव उपबाजार समितीच्या आवारात शेतकरी व ग्राहकांच्या हितासाठी पेट्रोल व सीएनजी पंप सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता पूर्ण झाली आहे. तसेच भालगाव येथे जनावरांच्या बाजारासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून लवकरच बाजार सुरू करण्यात येणार आहे. शेवगाव, पाथर्डी, गेवराई व शिरूर कासार तालुक्यांतील व्यापारी व शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

काटकसरीचा व पारदर्शक कारभार करत बाजार समिती नफ्यात आणल्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही समितीच्या कार्याचे कौतुक केले आहे. मात्र, आवश्यक नोकरभरतीस परवानगी न मिळाल्यास भविष्यात वाढीव सुविधा व विकासकामांवर मर्यादा येऊ शकतात, अशी खंतही व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, राज्यातील अनेक कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्येही नोकरभरतीबाबत अशीच परिस्थिती असून शासनाकडे परवानगीसाठी पाठपुरावा सुरू आहे. खाजगी बाजारपेठांशी स्पर्धा करताना अपुऱ्या मनुष्यबळामुळे बाजार समित्यांच्या विकासावर परिणाम होत असल्याने पणन मंत्र्यांनी याबाबत गांभीर्याने विचार करून नोकरभरतीवरील निर्बंध हटवावेत, अशी मागणी होत आहे.




## स्पर्धा परिक्षेसाठी जिद्द, चिकाटी व मेहनत ही त्रिसुत्रीच खरा मंत्र : महेश जंजिरे

### 'युपीएससी'तून थेट असिस्टंट कमांडंटपदी नियुक्ती झाल्याबद्दल 'जिल्हा मराठा'तर्फे झाला विशेष गौरव!

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी चांगल्या भौतिक सुविधा व मजबूत आर्थिक परिस्थिती या बाबी अजिबातच गरजेच्या नाहीत. त्यासाठी फक्त जिद्द, चिकाटी व मेहनत ही त्रिसुत्रीच खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात थेट असिस्टंट कमांडंट या पदावर नियुक्ती झालेले महेश जंजिरे यांनी केले.

येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलचे माजी विद्यार्थी महेश ईश्वर जंजिरे यांची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात असिस्टंट कमांडंट या पदावर थेट निवड झाली असून, खडतर प्रशिक्षणानंतर ते आता देशसेवेत रुजू होत आहेत. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे व सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्या हस्ते जंजिरे यांचा एका खास समारंभात विशेष गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, कार्यकारिणी सदस्या अरुणा काळे, ईश्वर जंजिरे, सुनीता जंजिरे, काजल जंजिरे, प्राचार्य धनंजय म्हस्के, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा. रवींद्र देवढे, प्रा. डॉ. सुधाकर सुंबे, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, पालक, कर्मचारी व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



दरे व आठरे पाटील यांनी जंजिरे यांच्या 'युपीएससी'तील अभूतपूर्व यशाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील तसेच परिस्थितीशी झगडत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महेश जंजिरे यांची 'युपीएससी'तून थेट असिस्टंट कमांडंट या पदावर बाजी मारल्याची ही यशोगाथा प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत या महेश जंजिरे यांचा गौरव केला.

महेश जंजिरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत विशेष मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'राज्य व देश पातळीवरील स्पर्धा परीक्षेत मराठी मुलांचा टक्का पूर्वी फारच कमी होता. आता तो वाढत असला तरी अपेक्षेएवढा नाही. अनेक विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या भौतिक सुविधा व मजबूत आर्थिक परिस्थिती याशिवाय स्पर्धा परीक्षेत यश मिळूच शकत नाही, असा न्यूनगंड आहे. परंतु ते साफ चुकीचे असून, जिद्द, चिकाटी व मेहनत या त्रिसुत्रीची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्यांना स्पर्धा परिक्षेतील यशापासून कोणीही रोखू शकत नाही.'

प्रास्ताविक प्राचार्य धनंजय म्हस्के यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा. रवींद्र देवढे, प्रा. सुधाकर सुंबे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**महेश जंजिरे यांना विद्यार्थ्यांचा गराडा व प्रश्नांची सरबत्ती!**

■ कार्यक्रमानंतर खाकी वर्दीतील रुबाबदार व्यक्तिमत्व असलेल्या महेश जंजिरे यांना उपस्थित विद्यार्थ्यांनी व पालकांनी अक्षरशः गराडा घालून कौतुक केले. अनेकांनी सह्या घेतल्या तर काहींनी वर्दीकडे चौकस कटाक्ष ठेवून हस्तांदोलन केले. काही उत्साही विद्यार्थी व पालकांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम, वाचनाची सवय, सामान्य ज्ञान, विषयांची निवड यासह विविध प्रश्न विचारले. महेश जंजिरे यांनी विद्यार्थ्यांना सोप्या आणि ओघवत्या भाषेत मार्गदर्शन केले आणि अभ्यासासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत अगस्ती विद्यालयाचे इयत्ता पाचवीतील २५ तर आठवीतील १७ विद्यार्थी पात्र

**● अकोले । वीरभूमी –**
श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती विद्यालय, अकोले येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाने यंदाही शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

यावर्षी पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षेत २५ विद्यार्थी, तर पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षेत १७ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत उगले अन्वी विजय, तातळे गौरी बाळू, बांबळे विनोद एकनाथ, मेंगाळ स्वरा सोमनाथ, बढे आरोही विजय, साबळे स्वरा अविनाश, वायाळ वेदांत राजू, शितोळे आदित्य रामचंद्र, घनकुटे स्वरा काशिनाथ, कानवडे ईश्वरी रेवणनाथ, इरनक ओंकार लालू, कानवडे संस्कार भानुदास, दराडे जितेश्री अभिजित, डहाळे कृष्णा सोमनाथ, जगताप करण राजेंद्र, नेहे क्षितिज विष्णू, शेणकर मनिष विशाल, सोनवणे प्रज्ञेश प्रदीप, मेंगाळ श्रेया शिवाजी, जगदाळे आर्या गणेश आणि शेख आलीना बबलू यांनी यश मिळविले.

तसेच पूर्व माध्यमिक परीक्षेत भोजने तन्मय मनोहर, उगले श्रेया महेश, आव्हाड विहान दत्तात्रय, सहाणे मैत्रीई निलेश, फरगडे तन्वी बळीराम, गवांदे राजवर्धन ज्ञानदेव, पोखरकर सर्वेश राजू, उगले समृद्धी योगेश, चौधरी साक्षी भास्कर, देशमुख अनुष्का नितीन, शेख उजेफ मोसिन, इरनक सोहम लालू, मोरे सिद्धी विकास, हांडे कार्तिकी भीमाशंकर, पोखरकर कृष्णा गणेश, ठावरे साहिल राजेंद्र आणि होलगीर आदिती दिलीप यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अतिरिक्त तासांचे नियोजन, नियमित सराव परीक्षा तसेच तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

या यशाबद्दल संस्थेच्या सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी यांनी विद्यालयाचे प्राचार्य मंगेश खांबेकर, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षिका नंदा गोपाळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य गिरीश नवले, सचिन शिंदे, मार्गदर्शक शिक्षक व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## दोन वर्षांपासून रखडलेल्या कोल्हार उदरमल घाटाच्या कामावर संताप; जय हिंद फांडेशनचे निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जेऊर-पाथर्डी मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या कोल्हार उदरमल घाटाच्या दोन वर्षांपासून रखडलेल्या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. हे काम अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्यात यावे तसेच कामातील दिरंगाईची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना पाठविले आहे. हे निवेदन जेऊर पंचक्रोशी तसेच चिचोंडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले असून, रखडलेल्या कामामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जेऊरवरून पाथर्डीकडे जाताना लागणारा कोल्हार उदरमल घाट हा परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली होती. अहिल्यानगर-बुऱ्हानगर-आगडगाव-कोल्हार रस्ता प्रजिमा ४९ अंतर्गत किलोमीटर १५ ते १८ या टप्प्यासाठी ३५० लाख रुपये आणि किलोमीटर १८ ते २१/५०० या टप्प्यासाठी ३५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या कामाचे भूमिपूजन ९ मार्च २०२४ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. भूमिपूजनानंतर काही प्रमाणात काम सुरू झाले; मात्र काही दिवसांतच काम अचानक बंद पडले. परिणामी घाटातील रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून, नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, या रखडलेल्या कामाबाबत जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी काम सुरू न झाल्यास परिसरातील सर्व गावांच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातून २५ फेब्रुवारी २०२५ रोजी आंदोलन स्थगित करण्याची विनंती करण्यात आली होती.

## अकोलेतील ५५ अल्पवयीन मातांच्या प्रकरणाची राज्य बाल हक्क आयोगाकडून गंभीर दखल

### बालविवाह रोखण्यासाठी राज्यात कडक धोरण; संबंधित अधिकाऱ्यांची मुंबईत सुनावणी

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यात ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत महिला व बालविकास विभागाच्या सर्वेक्षणात ५५ अल्पवयीन गरोदर मातांची नोंद आढळून आल्याने राज्यभर खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकाराची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना मुंबई येथील कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश देत सुनावणी घेतली. तसेच बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्याचे धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असून कडक नियमावली तयार केली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

अकोले तालुका बाल संरक्षण समितीचे अशासकीय सदस्य व पत्रकार श्रीनिवास रेणुकादास यांनी अकोले तालुक्यातील बालविवाह व अल्पवयीन मुली पळून जाण्याच्या वाढत्या घटनांबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली.

आयोगाचे सचिव पंकज देवरे यांनी या प्रकरणी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात सुनावणी आयोजित केली होती. यासाठी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बालकल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य, तसेच अकोले तालुका बाल संरक्षण समितीचे सदस्य श्रीनिवास रेणुकादास यांना नोटीस बजावण्यात आली होती.

आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीस आयोगाच्या सदस्या गीतांजली बुटी, शुभांगी तांबट, संजय लाखेपाटील, प्रवीण भुजाडे व मिलन जंगम उपस्थित होते. यावेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी प्रशासनाची बाजू मांडली.

आयोगाने स्पष्ट केले की, या प्रकरणात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि पोक्सो अधिनियम २०१२ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून येत आहे. वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आणि संबंधितांच्या उत्तरदायित्वाबाबत चर्चा करण्यासाठी ही अर्धन्यायिक सुनावणी घेण्यात आल्याचे आयोगाने नमूद केले.

सुमारे एक तास चाललेल्या सुनावणीत महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षणातील माहिती खरी असल्याचे मान्य केले. त्यानंतर आयोगाने या संदर्भात कारवाई का करण्यात आली नाही, याबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

यावेळी पोलिस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अकोले पोलिसांनी सन २०२१ पासून अशा स्वरूपाचे १२ गुन्हे दाखल केले असून राज्य राखीव पोलिस दलाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी ९ गुन्ह्यांची माहिती आयोगास दिली.

अहिल्यानगर महिला व बालविकास विभागाने गेल्या वर्षभरात जिल्ह्यातील १५५ बालविवाह रोखले आहेत. 'बालविवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत जिल्ह्यातील सुमारे २ लाख ६५ हजार नागरिकांनी ऑनलाइन शपथ घेतली आहे. याशिवाय पर्यवेक्षिका, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले आहे. अकोले तालुक्यात बालविवाहाचे प्रमाण अधिक असल्याची कबुली जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी सुनावणीदरम्यान दिली. त्यांच्यासोबत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

अकोले तालुका बाल संरक्षण समितीचे सदस्य श्रीनिवास रेणुकादास यांनी आयोगाकडे विविध मागण्या सादर केल्या. त्यामध्ये राज्यातील सर्व बाल संरक्षण समित्या सक्रिय करणे, लग्नासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांचा ना हरकत दाखला अनिवार्य करणे, ग्रामस्तरावर कार्यशाळा घेणे, पालक जनजागृती मोहीम राबविणे, आदिवासी भागांसाठी विशेष कृती कार्यक्रम तयार करणे तसेच ज्या गावात बालविवाह होतील त्या गावांच्या शासकीय अनुदानात कपात करणे अशा मागण्यांचा समावेश आहे. दरम्यान, राज्यात वाढत्या बालविवाहाच्या पार्श्वभूमीवर व्यापक कृती कार्यक्रम राबविण्यासाठी लवकरच बैठक बोलाविण्यात येणार असल्याचे आयोगाचे अध्यक्ष ड. संजय पुराणिक यांनी सांगितले. अकोलेतील ५५ अल्पवयीन मातांच्या प्रकरणाची आयोगाने गंभीर दखल घेतली असून यासंदर्भात राज्याचे धोरण लवकरच निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या वार्षिक शिबिराची उत्साहात सांगता

## गौतम पब्लिक स्कूलच्या अल्फा कंपनीने पटकावली चॅम्पियन ट्रॉफी

**● कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पब्लिक स्कूलमध्ये केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प ११ ते २० मे या कालावधीत अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

या १० दिवसीय शिबिरामध्ये संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील २८ शाळांतील इयत्ता ८ वी व ९ वी आणि १५ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी व १२ वी आणि महाविद्यालयातील एनसीसीचे एकूण ४०२ विद्यार्थी सहभागी झाले असून यामध्ये २६२ मुले आणि १४० मुलींचा समावेश होता. या संपूर्ण शिबिरादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा आणि लष्करी प्रशिक्षणात उत्कृष्ट कामगिरी बजावत गौतम पब्लिक स्कूलच्या अल्फा कंपनीने जनरल चॅम्पियन ट्रॉफीवर आपले नाव कोरले. यावेळी विद्यार्थ्यांना सुभेदार मेजर राजेंद्र सिंग, सुभेदार राजू भालेराव, हवालदार नितीन आणि सी.टी.ओ.इसाक सय्यद यांनी प्रशिक्षण दिले.

या ट्रेनिंग कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना व्यायाम, परेड, रायफल चालविणे प्रशिक्षण, नकाशा वाचन, जर्निंग डीस्टंन्स, फिल्ड ग्राम, हेल्थ आणि आयजीन या विषयांचे प्रशिक्षण दिले गेले. तसेच सेंन्ट्रल लेक्चरमध्ये आगीपासून बचाव करणे, वन विभागाच्या माध्यमातून जंगलातील प्राण्यांची ओळख आणि प्राण्यांच्या हल्ल्यातील प्राथमिक उपचार प्रशिक्षण, परिवहन विभागाकडून आपत्कालीन वाहतूक नियम आणि वाहन चालवण्याचे प्रशिक्षण ही दिले आहे. देशात राज्यात अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत किंवा नैसर्गिक आपत्तीत नागरिकांची सुरक्षा आणि बचाव करण्यासाठी या ट्रेनिंग कॅम्पचे केंद्र शासनाकडून आयोजन करण्यात आले असून हे सर्व विद्यार्थी आता कोणत्याही नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाऊ शकतात आणि नागरिकांची रक्षा करू शकतात असा विश्वास कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना यांनी व्यक्त केला.

शिबिरादरम्यान प्रशिक्षणाची पाहणी करण्यासाठी संभाजीनगर येथील ब्रिगेडियर ए. आर. बारबरे यांनी संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांसोबत घालवत त्यांना प्रशिक्षण दिले. ब्रिगेडियर बारबरे यांनी शालेय परिसर, तिथे उपलब्ध असलेल्या उत्तम सुविधा आणि शिबिराच्या उत्कृष्ट नियोजनाचे भरभरून कौतुक केले. तसेच हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांनी आमदार आशुतोष काळे, संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे, प्राचार्य नूर शेख व संपूर्ण गौतम परिवाराचे विशेष आभार व्यक्त केले. कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. चैतालीताई काळे यांच्यासह आदी मान्यवरांनी शिबिरास सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. गौतम पब्लिक स्कूलच्या अल्फा कंपनीच्या २१ विद्यार्थ्यांनी रायफल चालवण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल सौ.चैतालीताई काळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या प्रशिक्षण शिबिराची सांगता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने आणि पारितोषिक वितरणाने झाली. गौतमच्या अल्फा कंपनीने घवघवीत यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, सचिव सौ. चैतालीताई काळे, संस्था इन्स्पेक्टर नारायण बारे यांनी प्राचार्य नूर शेख, सी.टी.ओ. इसाक सय्यद, सर्व मार्गदर्शक आणि एनसीसी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

